**अपंग व्यक्ती ( समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण ) अधिनियम १९९५ च्या अनुषंगाने केंद्र शासनाने अपंगांच्या पदनिश्चिती बाबत प्रसिध्द केलेल्या यादी नुसार ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्र विकास सेवा गट-अ व गट-ब मधील पदावर शारीरिकदृष्टया अपंगांसाठी सुयोग्य पदे निश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय, मविसे १० /२०१०/ प्र.क्र.३६६/ आस्था-३
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२ दिनांक १४ जानेवारी, २०११

**वाचा :-** १) अपंग व्यक्ती ( समानसंधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण ) अधिनियम १९९५
२) शासन परिपत्रक,सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही १०९८ / प्र. १२ / १६-अ, दिनांक .२.५.१९९८
३) शासन निर्णय,ग्रा.वि.व.ज.सं.वि.क्र.मविसे १०९८/प्र.क्र.२७४७/१०,दिनांक १७.११.१९९८
४) शासन परिपत्रक क्र.साप्रवि क्रमांक अपंग१००१/६१/प्र.क्र.३६/२००२/१६-अ दि.१०.५.२००२
५) शासन निर्णय, ग्रा.वि.व ज.सं.वि क्र.मविसे१०९८/प्र.क्र.२७४७/आस्था,दि.२९.३.२००४
६) शासन निर्णय, ग्रा.वि.व ज.सं.वि क्र.मविसे१०९८/प्र.क्र.२७४७/आस्था दि.१७.७.२००८
७) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि.क्र.न्यायाप्र२००९/प्र.क्र.५/सुधार ३ दि.३.८.२०१०

**प्रस्तावना :-**

अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ दि.७.२.१९९६ पासून लागू झाला आहे. या कायद्यान्वये अपंगांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासन सेवेत ३% पदे आरक्षित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार सरळसेवेच्या भरतीच्या पदांवर अपंगांना आरक्षण विहित करणे/सुट देणे या संदर्भात याचिका क्र.१२९/०३ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार व पुर्नरचित तज्ञ समितीने केलेल्या सुधारणांनुसार ग्राम विकास व जल संधारण विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र विकास सेवा गट-अ आणि गट-ब संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या पदांसाठी संदर्भ क्र. ६ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. आता अपंग व्यक्तींसाठी सुधारीत पद निश्चिती करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.२२५/२००९ मध्ये मा.उच्च न्यायालयाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार, अपंगांसाठी शासकीय/निम शासकीय सेवेतील आरक्षित पदे सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने संदर्भ क्र.७ अन्वये असे कळविले आहे की, केंद्र शासनाने अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदीस अनुसरुन त्यांच्या अखत्यारीतील आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे निश्चित करुन यादी प्रसिध्द केलेली आहे. केंद्र शासनाच्या या यादीनुसार राज्य शासनाच्या अखत्यारीतील शासकीय व निम शासकीय आस्थापनेवरील जी पदे समान आहेत ती पदे संबंधीत विभागाने अपंगांसाठी निश्चित करण्यासाठी आदेश निर्गमित करावेत.

२. त्यास अनुसरुन ग्राम विकास व जल संधारण विभागाच्या अधिपत्याखालील सरळ सेवेने भरण्यात येणा-या महाराष्ट्र विकास सेवा गट-अ आणि गट-ब संवर्गातील पदांबाबत अपंगांसाठी पदे सुनिश्चित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय :-</u>**

अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाने ज्या यादीन्वये त्यांच्या अखत्यारीतील आस्थापनेवरील जी पदे अपंग व्यक्तींसाठी आरक्षण देण्यासाठी निश्चित केलेली आहेत त्या यादीशी तुलना करुन ग्राम विकास व जल संधारण विभागाच्या अधिपत्याखालील सरळ सेवेने भरण्यात येणा-या महाराष्ट्र विकास सेवा गट-अ आणि गट-ब संवर्गातील पदांसाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ठातील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अपंगांसाठी सुनिश्चित करण्यात येत आहेत. हे आदेश संदर्भाधिन दि.१७.७.२००८ चा शासन निर्णय अधिक्रमीत करुन काढण्यात येत आहेत.

२. अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ मधील कलम ३२ व कलम ३३ नुसार ग्राम विकास व जल संधारण विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र विकास सेवा गट-अ आणि गट-ब मधील पदांवरील सरळसेवा भरतीमध्ये किमान ४०% अपंगत्व असलेल्या अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग या प्रवर्गातील अपंग व्यक्तींसाठी प्रत्येकी १% या प्रमाणे ३% आरक्षण लागू राहील.

३. ज्या पदांच्या जबाबदा-या व कर्तव्ये अंध व्यक्तींना पार पाडणे शक्य आहे अशा पदांसाठी आवश्यक असणारे सहायक तंत्रज्ञान संबंधीत कार्यालयाकडून संबंधीत व्यक्तीस उपलब्ध करुन देण्यात येईल.निवड झालेल्या अशा अंध कर्मचा-यांना शासनाच्या सर्वसाधारण धोरणानुसार नियुक्तीचा परिविक्षा कालावधी लागू राहील.

४. हा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२००९/ प्र.क्र.५/सुधार ३ दि.३.८.२०१० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०११०११४२१११६००००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सरिता बांदेकर-देशमुख )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
सचिव , महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
निबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
निबंधक, उच्च न्यायालय, ( अपीलेट साईड ) मुंबई

प्रापोनेटरी ॲन्ड सिनियर मास्टर, उच्च न्यायालय, मुंबई.
महालेखापाल -१ ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा ) मुंबई
महालेखापाल-२ ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा ) नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी , मुंबई
सेवायोजन संचालनालय, मुंबई
समाजकल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय , मुंबई-४०० ०३२
प्रधान सचिव, ग्राम विकास यांचे स्वीय सहाय्यक,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
अन्य मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
कक्ष अधिकारी का.क्र. आस्था-२
निवड नस्ती का.क्र. आस्था-३

# परिशिष्ट

## अपंग व्यक्तींसाठी सुयोग्य पदांची निश्चिती

(शासन निर्णय ग्राम विकास व जल संधारण विभाग मविसे१०/२०१०/प्र.क्र.३६६/आस्था-३ दि.     जानेवारी २०११ चे सहपत्र)

**प्रशासकीय विभागाचे नाव :- ग्राम विकास व जल संधारण विभाग/ आस्था-3**
**कार्यालयाचे नाव :-**

| अ. क्र. | पदनाम | शारिरीक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा संवर्ग | पदाची कर्तव्य व जबाबदा-या | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/ प्रकल्प संचालक/ उपायुक्त (आस्थापना/विकास) | S,C,H,SE,RW, ST,W | OL, OA, LV, HH | **अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी** - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ व जिल्हा परिषद लेखासंहिता १९६८ मधील मुख्य कार्यकारी अधिका-यांना असणारे प्रशासकीय व आर्थिक मंजुरीचे अधिकारा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिका-यांना त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कृषि,बांधकाम,पशुसंवर्धन, समाजकल्याण आणि लघुसिंचन विभागा संदर्भात आहेत.अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सोपविण्यात आलेल्या विभागाशी संबंधित वर्ग -२ च्या अधिका-यांचे गोपनिय अहवाल लिहीणे.<br>**उपायुक्त (आस्थापना)** - त्यांच्याशी संबंधित महसुली विभागातील सर्व जिल्हा परिषदेमधील राजपत्रित व अराजपत्रित कर्मचा-यांच्या आस्थापना विषयक बाबी.<br>**उपायुक्त (विकास)** - त्यांच्याशी संबंधित महसुली विभागातील सर्व प्रकारच्या ग्रामिण योजनांचे सनियंत्रण.<br>**प्रकल्प संचालक** - जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतंर्गत राबविण्यात येणा-या योजनांचे सनियंत्रण . | पदोन्नतीचे पद |
| २ | उप मुख्यकार्यकारी अधिकारी/ गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी ) ( गट-अ ) | S,C,H,SE,RW, ST,W | OL, OA, LV, HH | **उप मुख्य कार्यकारी अधिकारी** -१)महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अंतर्गत कलम-९६ अन्वये त्याच्यावर लादण्यात आलेल्या किंवा त्याच्याकडे निहित केलेली कर्तव्ये व कार्ये पार पाडणे. २)महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अंतर्गत कलम -९९ आणि सदर अधिनियमान्वये केलेल्या नियमांच्या तरतूदींस अधिन राहून आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कामांच्या व विकास परियोजनांच्या बाबतीत तांत्रिक मंजूरी देणे. ३) प्रत्येक वर्षी आपल्या विभागात काम करणाऱ्या वर्ग-२ च्या सेवेतील अधिकाऱ्यांच्या कामांचे मुल्यमापन करणे | |
| ३ | गट विकास अधिकारी श्रेणी-२ (गट-ब) | S,C,H,SE,RW, ST,W | OL, OA, LV, HH | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | व त्याबाबतचे आपले मत गोपनीयरित्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे पाठविणे.४)आजारपणामुळे किंवा इतर वाजवी कारणामुळे प्रतिबंध झाला नसेल तर, जिल्हा परिषदेच्या व जिचा तो सचिव असेल अशा समितीच्या प्रत्येक सभेस हजर राहणे आणि पीठासन प्राधिकाऱ्याच्या परवानगीने सभेत जिच्यावर चर्चा चालू असेल अशा बाबींच्या संबधांत माहिती किंवा स्पष्टीकरण देणे. | |
| | | | **उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम.)** १)जिल्ह्यात पंचायतीच्या स्थापनेस उत्तेजन देण्यासाठी व त्यांच्या वाढीस व विकासास प्रोत्साहन देण्यासाठी अधिनियमाचे कलम-१३८, पोटकलम(१) अन्वये त्याजकडे सोपविलेल्या कर्तव्याच्या मर्यादेपर्यंत आवश्यक ती उपाययोजना करणे.२)ग्रामपंचायतीचे कार्य परिणामकारक होण्याकरीता आवश्यक तो सल्ला देणे व मार्गदर्शन करणे.३)पंचायतीच्या हिशोबांची तपासणी करणे आणि ते योग्त रितीने ठेवण्यात येतात किंवा नाही ते आणि पैशाची अफरातफर किंवा दुरुपयोग न होऊ देणे याकडे लक्ष पुरविणे.४)मुंबई ग्रामपंचायत (जिल्हा ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची कामे) नियम,१९५९ सोबत जोडलेल्या नमुना-अ मध्ये जिल्हयातील पंचायतींचे नोंदणी पुस्तक ठेवणे.५)पंचायतीचा वार्षिक/प्रशासकीय अहवाल तयार करण्यासाठी सरकारचा वेळोवेळी आवश्यक वाटतील असे अहवाल मागविणे.६)खेडात दौरा काढणे व सरकार वेळोवेळी निर्देश देईल त्याप्रमाणे पंचायतींची तपासणी करणे व पंचायतींचे कामकाज पाहणे.७)पंचायतीच्याबाबतीत गावातील लोकांमध्ये काही वाद आल्यास त्यांची मने वळवून व समझोता करुन तो मिटविणे.८)पंचायतीच्या कारभाराच्या बाबतीत गावकऱ्यांच्या काही तक्रारी असल्यास त्या ऐकून घेणे व शक्य झाल्यास त्याच ठिकाणी त्या तक्रारी मिटविणे.९)पंचायतींची दफ्तरे तपासणे व प्रत्येक पंचायतीचा चिटणीस आपली कर्तव्ये योग्य रितीने पार पाडतो किंवा नाही ते पाहणे. १०) स्त्रियांनी पंचायतीच्या कामकाजात सक्रिय भाग घेण्याबाबत त्यांचे मन वळवणे.११)पंचायतींचा मासिक आणि वार्षिक अहवाल तयार करणे. १२) मुख्य कार्यकारी अधिका-यांकडून सोपविण्यात आलेली इतर कामे/कर्तव्ये पार पाडणे. | |
| | | | **गट विकास अधिकारी** - महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अंतर्गत कलम-९८ व सदर अधिनियमान्वये केलेल्या नियमांच्या तरतूदींच्या अधिनतेने -१)मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण आदेशांच्या अधिनतेने पंचायत समितीच्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ किंवा वर्ग-४ च्या सेवेतील अधिकाऱ्यांना | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | किंवा कर्मचाऱ्यांना अनुपस्थिती रजा मंजूर करणे.२)अशा कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्याकडून कोणतीही माहिती, विवरण, विवरणपत्र, हिशोब, अहवाल किंवा स्पष्टीकरण मागविणे.३)पंचायत समितीच्या सभांच्या कामकाजांशी संबंधित असलेली सर्व कागदपत्रे व दस्तऐवज आपल्या अभिरक्षेत ठेवणे.४)या अधिनियमान्वये किंवा त्याखाली अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त एरवी या अधिनियमाच्या तरतूदीत गटात कार्यान्वित करण्यासाठी त्या गटात कार्यकारी अधिकारांचा वापर करणे.५)कलम १५५,पोटकलम (६) आणि कलम-१८८ या खाली पंचायत समितीस प्रदेय असणा-या अनुदानाच्या किंवा अनुदानांच्या रककमांतुन पैसे काढणे व संवितरीत करणे ६) गट अनुदानातून हाती घ्यावयाच्या कामांच्या व विकास परीयोजनेच्या संबंधात राज्य शासनाकडून विर्निदीष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे मालमत्ता संपादन करण्यास मंजुरी देण्याच्या अधिकारांचा वापर करणे. | |

**Abbreviations used** :- S-Sitting, **BN**-Bending, **SE**-Seeing, **RW**- Reading and Writing, **C**-Communication, **MF**-Manipulation by Fingers, **PP**-Pulling and Pushing, **L**-Lifting, **KC**- Kneeling and Croutching, **ST**- Standing, **W**-Walking, **BLA**- Both legs and Arms, **BA**- Both Arms, **OL**- One Leg , **OA**- One Arm, **OAL**- One Arm one leg, **B**- Blind, **LV**- Low Vision, **H**-Hearing, **MW**-Muscular Weakness, **OH**-Orthopedically Handicapped, **CP**-Cerebral Palsy, **LC**-Leprosy Cured, **VH**-Visually Handicapped, **HH**-Hearing Handicapped.